ठाणें
५
४
१८८३

नं. १८६

१०५

विषय
काव्य

संग्रहालय क्रमांक
८२४

लेखक प. ग. भांडारे

सन
१८८३

पुस्तकाचें नांव करुणाविलास

८२४

ह्यांनीं लोकोपकारार्थ
हरदायेथें
न्यायसुधा छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.
आवृत्ति १ ली—१०००प्रती.

किंमत २ आणे

हरदा—न्या. सु. प्रेस १८८३

श्रीमत्पंडितराजजगन्नाथविरचित
भामिनी विलासांतील

# करुणविलास

एकनाथ गणेश भांडारे,
ह्यांनीं
मूळ संस्कृत कवितांच्या, कै० कृष्णशास्त्री चिपळुणकरकृत पद्यरत्नावलींतील, विविधज्ञान विस्तारांतील व स्वकृत, भाषांतरांचा संग्रह केला;
तो
शंकर सखाराम तैलंग ब्रह्माणीकर
ह्यांनीं लोकोपकारार्थ
हरदायेथें
न्यायसुधा छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.
आवृत्ति १ ली—१०००प्रती.

किंमत २ आणे.

हरदा—न्या. सु. प्रेस १८८३

# प्रस्तावना.

पंडितरायांच्या " करुण विलासांतील " रसाळ वाणीचा लाभ सर्वत्रांस सहज व आल्पापायानें व्हावा; हा ह्या पुस्तकाचा मुख्य उद्देश. ह्यांत मूळ संस्कृत, नंतर कै० कृष्णशास्त्री चिपळुणकरकृत, नंतर विविधज्ञान विस्तारांतील, व नंतर स्वकृत कविता; असा क्रम धरला आहे. अज्ञानामुळें स्वकृत कवितांतील वर्णरचनेंत असणाऱ्या प्रमादांची रसिक जनांनीं मला सूचनापूर्वक क्षमा करावी; ही विनंती.

जबलपुर, ता० १६ नोवंबर १८८३

एकनाथ गणेश भांडारे.

सं.
३९८
मराठी ग्रंथ संग्रहालय
१८८

# ॥ करुणविलास प्रारंभः ॥

( वसंततिलकावृत्तम्. )

दैवे पराग्वदनशालिनि हंत जाते।
याते च सम्प्रति दिवंप्रति बन्धुरत्ने॥
कस्मै मनः कथयितासि निजामवस्थां।
कः शीतलैः शमयिता वचनै स्तवाधिम्॥१

( कै० चिपळूणकरकृत. )

अहा! कैसा झाला अवचित विधी निष्ठुर असा!
प्रिया एकाएकीं अमरसदना गेलि सरसा.
मना, आतां कोणा कथिशिल जिवींच्या हितगुजा?
सुखाच्या शद्बांनीं कवण निववू ताप हि तुझा?॥१

( विविधज्ञान–विस्तारांतील. )

झाला विधी बहुत निष्ठुर हाय! हाय!
प्राणप्रिया अवचितां त्रिदिवास जाय!
कोणाशिं तूं हितगुजें कथशील आतां?
त्वत्ताप कोण सुवचीं शमवील? चित्ता! ॥१

( स्वकृत. )

कसें मद्दुर्दैव प्रबल आजिं हें होय सदया!
सखी एकाएकीं त्रिदिवभुवना गेलि काशि या?
प्रिये! कोणाला, गे! कथशिल अतां गुप्तविनयां
सुवाक्यें त्वत्तापा शमविल जगीं कोण? हृदया! ॥१

# ॥ करुणाविलास प्रारंभः ॥

( वसंततिलकावृत्तम्. )

दैवे पराग्वदनशालिनि हंत जाते।
याते च सम्प्रति दिवंप्रति बन्धुरत्ने॥
कस्मै मनः कथयितासि निजामवस्थां।
कः शीतलैः शमयिता वचनै स्तवाधिम्॥१

( कै० चिपळूणकरकृत. )

अहा! कैसा झाला अवाचित विधी निष्ठुर असा!
प्रिया एकाएकीं अमरसदना गेलि सरसा.
मना, आतां कोणा कथिशिल जिवींच्या हितगुजा?
सुखाच्या शद्बांनीं कवण निववूं ताप हि तुझा?॥१

( विविधज्ञान—विस्तारांतील. )

झाला विधी बहुत निष्ठुर हाय! हाय!
प्राणप्रिया अवचितां त्रिदिवास जाय!
कोणाशि तूं हितगुजें कथशील आतां?
त्वत्ताप कोण सुवचीं शमवील? चित्ता! ॥१

( स्वकृत. )

कसें मद्दुर्दैव प्रबल आजिं हें होय सदया!
सखी एकाएकीं त्रिदिवभुवना गेलि काशि या?
प्रिये! कोणाला, गे! कथशिल अतां गुप्तविनयां
सुवाक्यें त्वत्तापा शमविल जगीं कोण? हृदया! ॥१

( वसंततिलकावृत्तम्. )

प्रत्युद्गता सविनयं सहसा पुरेव
स्मेरैः स्मरस्य सचिवैः सहसावलोकैः ।
मा मद्य मञ्जुरचनैर्वचनैश्च बाले !
हा लेश तोऽपि न कथं शिशिरी करोषि ॥२

( कै० चिपळुणकरकृत. )

घरातें मी येतां, दचकुनि उठोनी हसुनियां
विशाला नेत्रांहीं अमृतरसवृष्टी करुनियां
न कां चित्ता आजीं मधुरवचनीं हर्ष करिशी?
असे झाली माझ्या अगाळिक करें कोणति अशी? २

( विविधज्ञान विस्तारांतील. )

येऊंनियां मजपुढें विनये मृगाक्षी!
कामोद्धरी, स्मितधुरी, मधुरी कटाक्षी!
कां आज मंजुळ अशा वचनीं हि बाळे!
हा! लेश ही न मज तोषविशी? रसाळे! २

( स्वकृत. )

तुवां यावें प्राणेश्वरि! मजपुढें फार विनयें
कटाक्षातें कामोद्धरि! हसतची मारुनि सये !
न ऐकाया येती मुळिंच मज पीयूषरव ते
असें कां मन्दार्ये! वद! वद! अतां हे पतिरते! २

## करुणविलास

( वसंततिलका वृत्तम् )

सर्वेऽपि विस्मृतिपथं विषयाः प्रयाता-
विद्याऽपि खेदकलिता विमुखी बभूव ।
सा केवलं हरिणशावकलोचना मे
नैवापयाति ऱ्हृदयादधि देवतेव ॥ ३ ॥

( कै० चिपळुणरकृत. )

बुजालें दुःखानें स्मरण विषयांचें अवघिया,
अनभ्यासें गेली मज सकळ विद्या त्यजुनियां,
जिचे डोळे काळे बघुनि मृगबाळें हि झुरती,
वसे चित्तीं देवीपरि सतत ती मात्र सुदती ! ३

( विविधज्ञान–विस्तारांतील. )

स्वीकारिती विषयविस्मृतिपंथ सारे,
विद्याहि होय मलिना बहु खेदभारें,
देवीपरी हरिणशावकलोचना ती
जाई न मात्र हृदयांतुनि कुंददंती. ३

( स्वकृत )

अहा! स्वीकारीती उपरतिसुपंथास अमित
तशी विद्या खेदें बहुत मलिना होत वितत.
प्रिया, स्निग्धा, मुग्धा, हरिणनयना देविपरि ती
सुशीला जाईना तरुणि हृदयांतूनि सुदती. ३

( वसंत तिलका वृत्तम् )

निर्वाण मंगलपदं त्वरया विशन्त्या
मुक्ता दयावति दयापि किल त्वयासौ ।
यन्मां न भामिनि निभालयसि प्रभाते
नीलारविंदमदभंगपदैः कटाक्षैः ॥ ४ ॥

( कै० चिपळूणकरकृत. )

निघानीयां जातां अवचित सखी मुक्तिसदना
दयाशीला, वाटे, विसरलि दया ही सुवदना
कटाक्षांहीं नीलांबुजमदहरांहीं मजवरी,
कृपालेशातें ही प्रकट ह्मणुनी आज न करी. ४

( विविधज्ञान—विस्तारांतील. )

जातां त्वरें करुनि मोक्षपदासि कांते!
हा! आजि सोडिशि दया हि दयार्द्रचित्ते!
तेणें न यांशि अवलोकिशि नेत्रपातीं
नीलोत्पलें विकच ज्यांप्रति लाजतातीं! ४

( स्वकृत. )

दयार्द्रे! जाशीं तूं ग्रहण करण्या मोक्षपद गे!
दया कां सोडीली अवचित मला सांग सुभगे!
ज्यां नीळीं पद्में विकच असुनी लाजति मनीं
अशा नेत्रांनीं तूं मज न बघशी काय ह्मणुनी? ४

# करुणाविलास.

( वसंत तिलका वृत्तम् )

धृत्वा पदस्खलनभीतिवशात् करं मे
या रूढवत्यसि शिलाशकलं विवाहे ।
सा मां विहाय कथमद्य विलासिनि द्यां
आरोहसीति हृदयं शतधा प्रयाति ॥ १ ॥

[ कै० चिपळुणकरकृत. ]

पडायाच्या भीतिस्तव ममकरातें धरुनियां
विवाहीं पाषाणीं चढलिस, सखे! तूं जपुनियां
कशी ती तूं आजीं चढशि मज सोडून गगनीं
करी ऐशी शंका हृदय शतधां येउन मनीं. १

( विविधज्ञान–विस्तारांतील. )

हस्ता मम च्युतिभयें धरुनी करांहीं
जी तूं शिलेवरि सखे! चढशी विवाहीं
ती एकली अजि दिवीं चढशील कैशी?
शंका करी हृदय गे! शतधाच ऐशी. १

( स्वकृत. )

करांहीं तूं माझा कर दृढ धरूनी च्युतिभयें
विवाहीं पाषाणीं जपुन चढलीस प्रियसये!
कशी ती तूं आतां चढशिल दिवीं एकलि सुखें?
हजारों वेळां ही हृदय करि शंका प्रियसखे ! १

## करुणाविलास

( वसंत तिलका वृत्तम्. )

निर्दूषणा गुणवती रसभावपूर्णा
सालंकृतिः श्रवणमंगलवर्णराजिः ।
सा मामकीनकवितेव मनोभिरामा
रामा कदापि हृदयान्मम नापयाति ॥१॥

[ कै० चिपळूणकरकृत. ]

गुणांनीं जी पूर्णा अणुसम नसे दोष हि जिला
अलंकारीं साजे रस वसतसे जींत पहिला,
मृदू जीचे वर्ण श्रवण सुख देती परिसतां
वसे ती पद्माक्षी जशि हृदयीं माझी सुकविता. १

( विविधज्ञान–विस्तारांतील. )

सालंकृती, गुणवती, रसमूर्ति ही जी,
कर्णां सुखप्रद जिची मृदुवर्णराजी
जीतें न दोष लव जी हि मनोभिरामा
चित्तीं वसे सुकवितेपरि ती सुरामा. १

( स्वकृत. )

अलंकारांहीं जी युत असुन जी सद्गुणकला
रसाची जी मूर्ती तिळभर नसे दोष हि जिला
जिचे मंजू वर्ण प्रिय असुनि कर्णां सुखवितीं
वसे ती मच्चित्तीं प्रियसुकविते ऐशी सुदती. १

स-काव्य
५०८



## करुणविलास.

( वसंत तिलका वृत्तम् )

चिंता सशाम सकलापि सरोरुहाणां
इन्दोश्च बिम्बमसमां सुषमामयासीत् ।
अभ्युद्गतः कलकलः किल कोकिलानां
प्राणप्रिये! यदवधि त्वमितो गतासि ॥ ७ ॥

( कै० चिपळुणकरकृत. )

तुझें जाणें, प्राणेश्वरि! परिसुनी स्वर्गभुवनीं
अलापातें शंका त्यजुनि करिती कोकिल वनीं
निमाली चिंता ही सकल कमलांची अजि अहा,
कशी आतां चंद्रा अतुल सुषमा लाधली पहा! ७

( विविधज्ञान—विस्तारांतील. )

जाणें तुझे परिसुनी त्रिदिवीं सुदंती!
निःशंक कोकिल कलस्वर काढिताती
चिंता शमे सकल हाय! सरोरुहांची
लाधे सुधांशु अतुला सुषमाहि साची. ७

( स्वकृत. )

तुझें जाणें कांते! परिसुनि अहा! स्वर्गभुवनीं
अलापां काढीती मधुरतम हे कोकिलवनीं
नसे कांहीं चिंता शिव! शिव! अतां सर्व कमलां
सुधांशू ही लाधे अतुल सुषमा कैशि धवला? ७

## करुणाविलास.

(वसंत तिलका वृत्तम्)

सौदामिनीविलसितप्रतिमान् अकाण्डे
दत्वा कियन्त्यपि दिनानि महेन्द्रभोगान्।
मन्त्रोज्झितस्य नृपतेरिव राज्यलक्ष्मी-
र्भाग्यच्युतस्य करतो मम निर्गताऽसि ॥ ८ ॥

(कै० चिपळूणकरकृत.)

सखे! विद्युल्लेखास्फुरणचपला देउनि मला
सुरेंद्राच्या कांहीं दिवस उपभोगांस अतुला
अहा! मंत्रभ्रष्टक्षितिपतिस लक्ष्मी त्यजि जशी
त्या पुण्यें जातां त्यजुनि तशि गेलीस मजशीं. ८

(विविधज्ञान—विस्तारांतील.)

विद्युत्प्रभेसम महेंद्रसुखें अहा या!
कांहीं दिनें मधुरभाषिणि! देउनीयां
मंत्रोज्झिता नृपतिला कमलाचि जेवीं
भाग्यच्युतासि मज टाकिशि हाय! तेवीं. ८

(स्वकृत.)

विजेच्या चापल्यासम शचिसुखें कांहिं दिनें गे,!
मला देऊनीयां कमलनयने! हाय! सुभगे!
जशी मंत्राज्झीत क्षितिपतिस टाकीत कमला
तशी तूं टाकोनी अवचित सखे! गेलिस मला! ८

## करुणविलास

( वसंत तिलका वृत्तम् )

केनापि मे विलसितेन समुद्गतस्य
कोपस्य किन्नु करभोरु वशंवदाऽभूः ।
यन्मां विहाय सहसैव पतिव्रतापि
यातासि मुक्तरमणीसदनं विदूरम् ॥ १ ॥

( कै० चिपळूणकरकृत. )

न जाणों दुर्दैवें अगाळिक असे काय घडली
जिच्या योगें ऐशी तव मनिं अढी थोर पडली
ह्मणोनी सोडोनी मज रूसुन गेलीस सदनीं
सखी मुक्तीच्या तूं असुनि विमला कीर्ति हि जनीं १

( विविधज्ञान विस्तारांतील. )

हातूनि काय घडला अपराध नेणें
रागावलीस करभोरु! मनांत जेणें
सोडोनि तूं ह्मणुनि यास पतिव्रता ही
गेलीस मुक्तिरासिच्या अति दूर गेहीं. १

( स्वकृत. )

प्रमाद स्निग्धे गे! ममकरिं असा काय घडला?
जया योगें कोपानल मजवरीं त्वां विखुरला?
त्यजोनी जाशी तूं तरि, पतिरते! हें स्वसदन
तुला झालें आज प्रियकर सखी मुक्तिभवन? १

## करुणविलास

( वसंत तिलका वृत्तम् )

काव्यात्मना मनसि पर्य्यणमन् पुरा मे
पीयूषसारसदृशास्तव ये विलासाः ।
तानंतरेण रमणीरमणीयशीले
चेतोहरा सुकविता भविता कथं नः ॥१०॥

( कै० चिपळूणकरकृत. )

स्वरूपें काव्याच्या अजवरि सखे! जे प्रगटले
विलास प्रीतीचे सरस अमृतातुल्य घडले
तयांचा दुर्दैवें अवचित असा नाश घडतां
पुढें आतां कैशी मधुरमम होईल कविता? १०

( विविधज्ञान विस्तारांतील. )

आस्वादुनी तव विलास सदैव बाळे!
काव्यें नवीन रचिलीं बहु म्यां रसाळें
त्यांचा असा सुमुखि! आजि विघात होतां
होईल कां सरस गे! ममकाव्य आतां? १०

( स्वकृत. )

विलास प्रीतीचे अनुभवुनि मीं जीं रचियलीं
सुकाव्यें तीं झालीं रसयुत सुधातुल्य सगळीं!
लया तेची जातां अवचित असे इंदुवदने!
पुढें आतां कैशीं सुरस मम होतील कवनें! १०

## करुणविलास

( वसंत तिलका वृत्तम् )

या तावकीनमधुरस्मितकांतिकांते
भूमंडले विफलतां कविषु व्यतानीत्।
सा कातराक्षि विलयं त्वयि यातवत्यां
राकाधुना वहति वैभवमिन्दिरायाः[1] ॥ ११ ।

( विविधज्ञान विस्तारांतील. )

भूमंडळीं तवमृदुस्मितकांति घेतां
राका कवींस बहु भासत मोघ होती
जातांचि तूं अवचिता परि नाकभागीं
शोभा पहा अतुल ती मिरवी शुभांगी ! ११

( स्वकृत. )

स्मितें हास्यें तूझ्या जगिं धवल कांती पसरली
तधीं त्या राकेतें सकल कविंनीं तुच्छ गणिली!
अतां जातांची तूं अवचित सखे! निर्जरगृहीं
स्वदीप्तीश्रेष्ठत्वा जगिं मिरविते ती अजि महीं! ११

---

१ पद्यरत्नावलींत ह्या श्लोकाचें भाषांतर नाहीं.

( वसंत तिलका वृत्तम् )

मन्दस्मितेन सुधया परिषिच्य या मां
नेत्रोत्पलै र्विकसितैरनिशं समीजे।
सा नित्यमंगलमयी गृहदेवता मे
कामेश्वरी हृदयतो दयिता न याति ॥१२॥

( कै० चिपळूणकरकृत. )

सुधातुल्यें हास्यें करुनि अभिषेकास मजला
कटाक्षांनीं वर्षे जणु मजवरी नील कमलां
मृगाक्षी मांगल्यप्रदविधिविधात्री सुवदना
न सोडी चित्तातें क्षणभरि हि ती कुंदरदना. १२

( विविधज्ञान विस्तारांतील. )

मंदास्मितामृतरसें अभिषेकुनी जी
नेत्रोत्पलें विकसतीं मज नित्य पूजी
कामेश्वरी सततमंगलकार्यकर्ती
चित्ता न सोडि दयिता गृहदेवता ती. १२

( स्वकृत )

अभीषेकुनी जी बहुत मृदुहास्यामृतरसें
सदां माझी पूजा विकचनयनाब्जीं करितसे
अशी जी मत्कांता कमलनयना, मंगलमया
न सोडी ती एक क्षणहि गृहदेवी स्वहृदया! १२

## करुणविलास

(वसंत तिलका वृत्तम्)

भूमौ स्थिता रमणनाथ मनोहरेति
सम्बोधनै र्यमधिरोपि तवस्यासि द्याम्।
स्वर्गं गता कथमिव क्षिपसि त्वमेण
शावाक्षि तं धरणिधूलिषु मामिदानीम् ॥१३॥

( कै० चिपळूणकरकृत. )

असोनी त्वां भूमिवर चढविलें ज्या सुरपदीं
प्रिया! नाथा! ऐशा अति मधुर संबोधनपदीं
तया मातें कैशी धरणितलधूलींत सखये!
दिवस्था होवोनी ढकलिशि दया कां तुज न ये? १३

( विविधज्ञान विस्तारांतील. )

नेलें दिवीं असुनि भूमिवरीहि ज्यातें
योजोनियां " रमण! " " नाथ!" अशा पदांतें
वामाक्षि! जाऊनि दिवीं अजि त्याचि मातें
कां लोटिशी धरणि धूलिंत सांग कांते! १३

[ स्वकृत. ]

सदां योजोनीयां "प्रिय!" "रमण!" ऐशा मृदु पदां
असोनी भूमीं त्वां मज चढविलें नाकिं शतदां
अतां हे वामाक्षी! त्यजुनि धरणीधूलिंत मशीं
कशी स्वर्गा जाशी? अनुचिताचि हें कर्म तुजशीं! १३

( वसंत तिलका वृत्तम् )

लावण्यमुज्जल मपास्ततुलञ्च शीलं
लोकोत्तरम् विनयमर्थमयं नयञ्च ।
एतान् गुणानशरणानथ माञ्च हित्वा
हा हन्त सुन्दरि कथं त्रिदिवं गतासि ॥१४॥

( कै० चिपळुणकरकृत. )

अपूर्वा लावण्या, अनुपमसुशीला, सुविनया
अपरा चातुर्या, अगणितकालांतें हि सुनया,
गुणां ऐशा कोणा निरविशि सखे आणि मजला
नसे थारा त्यांतें मजहि दुसरा, ज्ञात तुजला ! १४

( विविधज्ञान विस्तारांतील )

लावण्य हें अतुल; शीलहि हें अपूर्व;
लोकोत्तरानाति; तसा नय हाहि सर्व;
टाकोनि हे गुण अनाथ, मलाहि कांते!
जाशी कशी प्रियसखे! अजि तूं दिवांते? १४

( स्वकृत. )

असे तूझा थारा अतुल छवि लोकोत्तर नया
पटुत्वा सच्छीला अमित सुकलां आणि विनया
गुणां या त्यागोनी प्रियसखि! अनाथत्व मजला
अहा! देवोनीयां, सुरगृह गमे इष्ट तुजला! १४

## करुणविलास

[ वसंत तिलका वृत्तम् ]

कान्त्या सुवर्णवरया परयाच शुध्या
नित्यं स्विकाः खलु शिखाः परितः क्षिपन्तीम्।
चेतो हरामपि कुशेशयलोचने त्वां
जानामि कोप कलुषो दहनो ददाह ॥१९॥

( कै० चिपळूणकरकृत. )

प्रभापाविभ्यांहीं स्वसम तुज पाहून दहना
अला वाटे हेवा मनिं बहुत त्या कृष्णवदना
तयानें या रोषें मज गमतसे जाळिलि तुला
दया त्या कैची जो स्वजननिहि खाऊं न चुकला! १९

( विविधज्ञान विस्तारांतील. )

कांती शुचित्वहि बघोनि तुझें विशेष
हेवा मनीं बहुत येउनियां तयास
चेतोहरेसहिं तुला अजि त्याचि रागें
हां! जाळिलें समजलों! दहनें अहा! गे! १९

( स्वकृत. )

स्वसौंदर्यासारी विमल तनुकांती बघुनियां
मनीं हेवा आला बहुताचि जणों त्या शिखिचिया
ह्मणोनी त्या दुष्टें तवतनुलता कोलि दहन
यशोच्छा कैची त्या ह्मणवि जनिं जो कृष्णवदन! १९

## करुणाविलास

( वसंत तिलका वृत्तम् )

कर्पूरवर्तिरिव लोचनतापहन्त्री
फुल्लाम्बुजस्त्रगिव कंठ सुखैक हेतुः ।
चेतश्चमत्कृतिपदं कवितेव रम्या
नम्या नरोभिरमरीव हिसा विरेजे ॥ १६॥

( कै० चिपळुणकरकृत. )

सुधास्पर्शें जेवीं निवातें नयनें जीस बघुनी
जिचा कंठीं वाटे करकमलहारापरि मनीं
करी जी उल्हासा अतुल कविता सुंदर जशी
तुला नाहीं कोठें मनुजभुवनीं योग्य तुजशी! १६

( विविधज्ञान विस्तारांतील. )

कर्पूरवर्तिपरि लोचनतापहारी
दे अब्ज हारसमकंठ सुखाहि भारी
आनंदवी बहु मना कविते परीजे
ती अप्सरेपरि मनोभवनीं विराजे १६

( स्वकृत. )

मृगाक्षी कर्पूरांजनसम मदाक्षांस सुखवी
भुजा जीची कंठीं नव कमलमालेस अठवी
मनातें जी माझ्या रुचिर कवितेसार रिझवी
सदां खेळे चित्तीं मममन कसें ती न भुलवी! १६

# करुणाविलास

(वसंत तिलका वृत्तम्)

स्वप्नान्तरेऽपि खलु भामिनि पत्युरन्यं
या दृष्टवत्यसि न कञ्चन साभिलाषम् ।
मा सम्प्रति प्रचलिताऽसिगुणैर्विहीनं
प्राप्तुं कथं कथय हन्त परं पुमांसम्॥ १७॥

( कै० चिपळूणकरकृत. )

न पाही स्वप्नीं ही पतिविण कधीं जी नरदुजा
स्पृहायुक्तें चित्तें जितकमलनालोत्तमभुजा
सुशीला तूं ऐशी परपुरुष जो निर्गुण तया
कशी पाहूं जाशी हरिणनयने! सत्वरतया १७

[ विविधज्ञान विस्तारांतील. ]

स्वप्नींहि भामिनि पतीविण अन्य कोणी
त्वां पाहिला न अभिलाष मनीं धरूनी
ती तूं कशी सुदति! आजि पहावयातें
गेलीस निर्गुण अशा पर पूरुषातें! १७

[ स्वकृत. ]

न पाहीला स्वप्नीं मजविण दुजा सस्पृहमनें
कधीं ही तूं कांते! प्रियपतिरते! इंदुवदने!
असोनी या ऐसें परपुरुष जो निर्गुण तया
पहायातें जाशी सुदति! आजें मातें त्यजुनियां! १७

१८ ठाणे.

## करुणविलास

[ वसंत तिलका वृत्तम् ]

रीतिं गिराममृतवृष्टिकिरां त्वदीयां
ताञ्चाकृतिं कृतिवरैरभिनन्दनीयाम् ।
लोकोत्तरामथ कृतिञ्च सुधारसार्द्रां
स्तोतुं न कस्य समुदेति मनः प्रसादः ॥१८॥

( कै० चिपळुणकरकृत. )

तीं भाषणें मधुर जीं अमृतासमान
लावण्य तें रति हि देत जयास मान
तें शील ज्यास तुलना न मिळेचि कोठें
कोणास हर्ष गुण हे स्तवितां न वाटे! १८

( विविधज्ञान विस्तारांतील. )

वाणी मनोहर सुधारसवृष्टिरूप
जें वर्णिलें कविवरीं वहु तें स्वरूप
तें शील जें हि करि तुच्छ सुधारसाला
होई कसें न सुख ह्या स्तवितां गुणाला? १८

[ स्वकृत. ]

मृदूवाणी जीची अमृतरसवृष्टीच गमते
जिच्या लावण्यातें वघुनि रतिही चित्तिं झुरते
जिच्या सच्छीलाची अवनिवरिं होई न तुलना
तिचे गातां ऐसे सकल गुण हा हर्ष न कुणा? १८

# ☞ विशेष सूचना.

आह्मीं या पुस्तकांत, कोणत्या दोन पुस्तकांतले उतारे घेतले आहेत; हें मुखपृष्ठावर कळविलेंच आहे. पद्यरत्नावलीचा* एक हल्लीं सरकाराकडे असल्यामुळें आह्मीं मेहेरबान डायरेक्टर ऑफ् पब्लिक इन्स्ट्रक्शन ह्यांची, व भामिनीविलासाच्या भाषांतरकारांची परवानगी घेतली आहे. ती मिळण्यास जरासा विलंब लागल्यामुळें जाहिरातींत कळविल्याप्रमाणें पुस्तक प्रसिद्ध झालें नाहीं. ह्याबद्दल वर्गणीदारांनीं क्षमा करावी. पुढील आवृत्तींत हे उतारे येणार नाहींत.

तारीख १९ जानेवारी सन १८८४.

---

* पृ० ६४ पासून ६८ पर्यंत पहा.

---

न्या. सु. छा. छापिलें—हरदा, १८८४.